**Fixation of "Barrack Blanket"**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन,मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई- ४०० ०३२.**

**परिपत्रक क्रमांकः उसं/भांखसं/बॅरक ब्लँकेट/दर निश्चिती/(२८)/**

**२००७-२००८/बी-३००३७, दिनांक :- २६/१०/२००७.**

**वाचा :-**

1. **शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/२५१२/उद्योग-६, दिनांक ०२/०१/१९९२.**
2. **उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.भाखसं-१०९५/२७०८/ उद्योग-६, दि.१९/०६/१९९६.**
3. **मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समिती निर्णय क्रमांक १४, दिनांक ०८/१०/२००७.**

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस/१०८८/२५१२/उद्योग-६, दि.०२/०१/१९९२ च्या परिशिष्ट पाचमध्ये शासनाचे अंगीकृत व्यवसायांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित केलेल्या विविध वस्तूंची यादी देण्यात आली आहे. याच शासन निर्णयातील परिच्छेद- ७ नुसार संबंधित संस्थांकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तूंची किंमत ठरविण्याचे अधिकार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या, भांडार खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ०२/०१/१९९२ च्या निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४ प्रमाणे बॅरक ब्लँकेट ही बाब कारागृहास आरक्षित आहे. जर कारागृह विभागाने वेळेवर व नियमित पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली तर विभागांना वस्तू खरेदी बाबत अडचणी येऊ नयेत म्हणून खाली नमूद केलेल्या आरक्षित संस्थाकडून बॅरक ब्लँकेटची खरेदी करण्यास मुभा राहिल.

**भांडार खरेदी समिती निर्णय :-** मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने त्यांच्या दिनांक ०८/१०/२००७ रोजी झालेल्या बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे, व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई, यांच्या प्रस्तावावर विचार करुन खालील प्रमाणे दरनिश्चिती केली आहे. शासकीय कार्यालयांनी बॅरक ब्लँकेट खरेदी करताना **मे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे, व मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई** या संस्थाकडून खाली दिलेल्या दरानुसार खरेदी करण्यात याव्यात. त्यांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र. २२६१ ७६४१-४२-४३. फॅक्स क्र. (०२२) २२६९ ६८०८.

२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेड, मेढी फार्म, गोखलेनगर, पुणे- ४११ ०१६. दुरध्वनी -(०२०) ५६५७ ११२ /५६६३ १५२.

**सन २००७-२००८ वर्षाकरीता ''बरॅक ब्लँकेट'' खालील दरनिश्चित करण्यात आले आहे.**

| अ. क्र. | संस्थाची नांवे | आकारमान<br>रुंदी लांबी | विनिर्देश | निश्चित केलेले दर |
|---|---|---|---|---|
| १. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लि., गोखलेनगर, पुणे. | १) काळी -<br>१५० से.मी ×२२५ से.मी.,<br>वजन २३६० ग्रॅम | इंचातील धागे रंग काळा<br>उभे - १० आडवे - ८<br>लोकर प्रमाण ९० टक्के | **रु. ३०५.७६ प्रती नग** |
| | | २) तलम (सुपर फाईन)<br>१५२ से.मी.× २३० से.मी.,<br>वजन १८०० ग्रॅम | ताणा सुतवजन २ किलो<br>बाण सुत वजन ५०० ग्रॅम | **रु. ४३१.३४ प्रती नग** |
| २. | महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई | १) काळी -<br>१५० से.मी ×२२५ से.मी.,<br>वजन २५०० ग्रॅम | इंचातील धागे रंग काळा<br>उभे - १० आडवे - ८<br>लोकर प्रमाण १०० टक्के<br>ताणाबाणा वजन ५०० ग्रॅम | **रु. ३०५.७६ प्रती नग** |
| | | २) रंगीत तलम<br>१५२ से.मी.× २३० से.मी.,<br>वजन १८०० ग्रॅम | लोकर प्रमाण ९० टक्के<br>नायलॉन १० टक्के | **रु. ४३१.३४ प्रती नग** |

**हे दर एफ.ओ.आर डेस्टिनेशन सर्व कर समाविष्टीत असे राहतील. वरील दर दि. ३० जून, २००८ पर्यंत ग्राहय राहतील.**

**शासनाचे अंगीकृत महामंडळ/मंडळ यांनी त्यांचेकडे नोंदणीकृत उत्पादक संस्था/सभासद व मंडळांची/महामंडळानी स्वतःच उत्पादन केलेल्या वस्तूंचे शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा व महामंडळांनी ''बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये.''**

पुरवठा कालावधी :-**मागणीपत्र मिळाल्यापासून ४ आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक सर्व मालाची मागणीकाराला पोच सुस्थितीत व विनिर्देशा प्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत करणे आवश्यक आहे. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या प्रती आठवडा प्रमाणे दंड आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.**

(अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० टक्के दंड आकारला जाईल.

(ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५ टक्के दंड आकारला जाईल.

**(वि. वा. भामरे)**

**उद्योग सह संचालक ( भां.ख.)**
**यांचे मान्यतेने.**

**उद्योग उप संचालक ( भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.**

प्रति,

१) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी क्र. २२६१ ७६४१-४२-४३. फॅक्स क्र. (०२२) २२६९ ६८०८.

२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमीटेड, मेढी फार्म, गोखलेनगर, पुणे- ४११ ०१६. दुरध्वनी -(०२०) ५६५७ ११२ /५६६३ १५२.